## हमाल कंत्राट निविदा सूचना

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शासकीय धान्य गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी हमाल कंत्राट सन २०१९-२०२२ या कालावधीसाठी निश्चित करण्यासाठी ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.**

---

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक१२१७/प्र.क्र.९८/ना.पु.१६-अ,दिनांक ०८ मे, २०१८ व सम क्रमांक दिनांक ०१ ऑक्टोबर २०१८ व २२ ऑक्टोबर २०१८ चे शासन शुध्दीपत्रकान्वये, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी हमाल कंत्राट सन २०१९-२०२२ या कालावधीसाठी निश्चित करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयातील शासकीय गोदामातील अन्नधान्याच्या हाताळणूकीसाठी हमाल कंत्राट निश्चित करण्याकरीता ई-निवीदा प्रसिध्द करुन इच्छूक प्रत्यक्ष हमालीचे काम करणारे सदस्य यांच्या नोंदणीकृत हमाल कामगार सहकारी संस्था व हमाल सदस्य असलेल्या सहकारी संस्था तसेच नोंदणीकृत हमाल कामगार सहकारी संस्था निविदेमध्ये भाग घेत नसल्यास नोंदणीकृत बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांकडून कंत्राटदाराची नेमणूक तीन वर्षांचा कालावधीसाठी करणेस व्दि लिफाफा पध्दतीने जाहिर खुल्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा फॉर्मची किंमत | रुपये ५०००/- (रु.पाच हजार मात्र) |
| २ | इसारा रक्कम | निविदेच्या अटी व शर्ती मध्ये मु.क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गोदाम निहाय रक्कम |
| ३ | प्रतिभुती ठेव (Security Deposit) | निविदेच्या अटी व शर्ती मध्ये मु.क्र. ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गोदाम निहाय रक्कम |
| ४ | निविदा प्रसिध्द करणे. | दिनांक ०७.०३.२०१९ सकाळी ११.००वाजता |
| ५ | निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक ०७.०३.२०१९ सकाळी ११.००वाजलेपासुन<br>दिनांक २१.०३.२०१९ रोजी संध्या.३.०० वाजेपर्यंत |
| ६ | निविदा अर्जाची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन भरण्याचा दिनांक | दिनांक ०७.०३.२०१९ सकाळी ११.००वाजलेपासुन<br>दिनांक २१.०३.२०१९ रोजी संध्या.३.०० वाजेपर्यंत |
| ८ | निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २२.०३.२०१९ दुपारी ३.०० वाजता |
| ९ | निविदा उघडण्याचे ठिकाण | स्थळ-जिल्हाधिकारी कार्यालय,सिंधुदुर्ग,सिंधुदुर्ग नगरी |
| १० | संपर्क | स्थळ-जिल्हाधिकारी कार्यालय,सिंधुदुर्ग,सिंधुदुर्ग नगरी<br>ई-मेल-dsosindhudurg@yahoo.com<br>फोन नं. ०२३६२-२२८८४६ |

ई-निविदा पध्दती करीता उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय

क्र.भाखंस १०९४/ (२६७९)/ उद्योग ६, दि.०२/०१/९२ व क्र.भाखंस १०९४/ (२६७९)/ उद्योग-६, दि.३०/०३/१९९४ मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार व्दि लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येईल व या शासन निर्णयातील सर्व विहीत अटी व शर्ती लागू राहतील. सदर निविदेची सविस्तर माहिती अटी व शर्तींसह निविदेच्या अर्जाचा नमूना व दराचा तक्ता इत्यादीसह https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०७-०३-२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. निविदा उपलब्ध होईल. ई-निविदा वेळापत्रकाबाबत सर्व इच्छुक निविदाकारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी निविदा सूचनेमध्ये दिलेल्या तारखा पाळाव्यात. कारण ई-निविदा प्रणाली ही दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यरत असते. वेळ संपल्यानंतर कोणतीही कार्यवाही करता येत नाही. तसेच ई-निविदेबाबतची तपशिलवार माहिती www.sindhudurg.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ.दिलीप पांढरपट्टे)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग